## तीन लाखांचा गुटखा पकडला

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**
: शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या विक्री होत आहे. त्यावर शिक्कामोर्तब करणारी कारवाई पुसद शहरात पुढे आली. पुसदच्या एका गोडावूनमधून पोलिसांनी तब्बल २ लाख ९६ हजार २२५ रूपयांचा गुटखा जप्त केला. ३१ जानेवारीला केलेल्या या कारवाईत ३ फेब्रुवारीला पुसद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुसद शहरातील मदिना मस्जीदजवळील हमीद याकूब इसानी यांच्या गोडावूनमध्ये पोलिसांनी छापा टाकला. तेथे मानवी शरीरास अपायकारक असलेला वेगवेगळ्या प्रकारचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि पान मसाला (गुटखा) मुद्देमाल आढळून आला. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक केदार यांच्या फिर्यादीवरून हमीद याकूफ इसानी रा. मदिना मस्जीदजवळ महात्मा फुले वार्ड पुसद याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### ७ वाहनांमधील बॅटऱ्या चोरल्या

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**
गिट्टी खदानीवर उभ्या असलेल्या ७ वाहनांतील बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्या. ही घटना दारव्हा तालुक्यातील बागवाडी येथे साई स्टोन क्रेशन गिट्टी खदानीत ३१ जानेवारीला घडला. या प्रकरणी महादेवराव बापूराव काळे (६५) रा. सायखेडा यांनी दारव्हा पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार एका ४०७ वाहनातील तसेच ६ ट्रॅक्टरमधील एकंदर ७ बॅटऱ्या चोरीस गेल्या आहेत. पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

### महिलेला मारहाण

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**
तुमच्या घराची जागा आमची आहे, असे म्हणत एका इसमाने महिलेशी वाद घातला. यात त्या महिलेला गंभीर मारहाण करण्यात आली. ही घटना दिग्रस तालुक्यातील सावंगा खुर्द येथे ३ फेब्रुवारीला घडली. जयश्री निळकंठ भुसाळे (३२) रा. सावंगा खुर्द यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांना गजानन एकनाथ खांदवे (४२) रा. सावंगा खुर्द याने मारहाण केली. जागेच्या मालकीवरून वाद घालत खांदवे याने भुसाळे यांना शिवीगाळ करत काठीने मारहाण केली. उजव्या हाताच्या बोटावर मारून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. प्राप्त फिर्यादीवरून दिग्रस पोलिसांनी गजानन खांदवे विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### भाविकाचा ऑटो उलटला, चिमुकली ठार

**•युवाराष्ट्र दर्शन पुसद :**
देवदर्शनासाठी जात असलेल्या भाविकांचा ऑटो पलटी होऊन भीषण अपघात झाला. यात चिमुकली जागीच ठार झाली तर एक महिला गंभीर जखमी आहे. ही घटना मंगळवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास उमरखेड रोडवरील मंगलमूर्ती परिसरात घडली. दीपाली अतुल सुरोशे (वय ११, रा. शिवाजीनगर, पुसद) या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला असून, सपना सतीश सुरोशे (२१) ही महिला गंभीर जखमी झाली आहे.

# जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांचा दुष्काळ

## शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार; खिचडी शिजवणाऱ्या महिलांच्या भरवशावर सुरू आहे शाळा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव, दि. ४ फेब्रुवारी**



महाराष्ट्र शासन एकीकडे 'डिजिटल शाळा' आणि 'स्मार्ट क्लासरूम'च्या माध्यमातून शिक्षणाचा दर्जा उंचावल्याचा दावा करत असले, तरी जमिनीवरची परिस्थिती मात्र भयावह आहे. महागाव तालुक्यातील सवना येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत गेल्या अनेक दिवसांपासून एकही शिक्षक नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल ५० विद्यार्थिनींचे शैक्षणिक भवितव्य सध्या वाऱ्यावर असून, शिक्षण विभागाच्या या दुर्लक्षामुळे पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महागाव तालुक्यातील सवना येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात. पटसंख्या ५० च्या आसपास असतांनाही येथे एकही नियमित शिक्षक नियुक्त नाही. धक्कादायक बाब म्हणजे, विद्यार्थिनी शाळेत येतात, दप्तर ठेवतात, पण शिकवायला कोणीच नसल्याने दिवसभर खेळून घरी परततात. काही वेळा शाळेची स्वच्छता किंवा शाळा उघडण्याचे काम खिचडी शिजवणाऱ्या महिला किंवा ग्रामस्थांना करावे लागत आहे. यामुळे संतप्त पालकांनी विद्यार्थिनींना घेऊन आज पंचायत समिती कार्यालयात धडक देत गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात शाळा भरविली.

'शिक्षण सर्वांसाठी' आणि 'मुली शिकवा, मुली वाचवा' अशा घोषणा देणाऱ्या सरकारला सवना येथील या चिमुकल्या मुलींचा आवाज ऐकू येत नसल्याचे चित्र आहे. आरटीई कायद्यानुसार ठराविक विद्यार्थी संख्येमागे शिक्षक असणे बंधनकारक असताना, या शाळेत शून्यावर शिक्षक संख्या कशी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या गंभीर विषयाबाबत ग्रामस्थांनी आणि पालकांनी वारंवार ग्रामपंचायत तसेच शिक्षण विभागाकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्यापपर्यंत प्रशासनाला जाग आलेली नाही. जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभारामुळे ग्रामीण भागातील गरीब मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

५० विद्यार्थी असताना एकाही शिक्षकाची नियुक्ती का झाली नाही? शिक्षणाधिकाऱ्यांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे का?, ग्रामीण भागातील शाळा फक्त खिचडी वाटपापुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत का? असा संतप्त सवाल पालकांनी केला आहे.

जर येत्या काही दिवसांत सवना शाळेत कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती झाली नाही, तर ग्रामस्थ आणि पालकांच्या वतीने शिक्षण विभागावर धडक मोर्चा काढण्यात येईल आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता या प्रकारानंतर तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे डोळे उघडणार की विद्यार्थिनींचे नुकसान असेच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# यवतमाळात भव्य जैन बिझनेस कार्निवल

## उद्योजकतेला नवी दिशा देणारा चार दिवसीय महोत्सव

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ | प्रतिनिधी, दि. ४ फेब्रुवारी**

उद्योजकता, नवकल्पना आणि व्यापाराच्या नव्या संधींचा संगम साधणारा भव्य जैन बिझनेस कार्निवल यवतमाळ शहरात 6 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. समता मैदान, यवतमाळ येथे होणाऱ्या या चार दिवसीय कार्निवलचे आयोजन जोश फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योजक, व्यापारी, स्टार्टअप्स आणि नवोदित व्यावसायिकांसाठी हे एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. या बिझनेस कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील आकर्षक स्टॉल्स, उत्पादन व सेवांचे सादरीकरण, नेटवर्किंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन,

YAVATMAL JOSH FOUNDATION

तसेच व्यवसायवाढीसाठी उपयुक्त माहिती व संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन, स्थानिक व्यवसायांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि उद्योजकांमध्ये परस्पर सहकार्य वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. व्यवसायासोबतच मनोरंजनालाही विशेष स्थान देण्यात आले असून, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, लहान मुलांसाठी खेळणी, विविध प्रकारचे रुचकर खाद्यपदार्थ आणि नव्या संकल्पना.

# एस.टी. प्रशासनाचा मनमानी कारभार

## किनवट-उमरखेड बसफेरी वारंवार रद्द, विद्यार्थी व प्रवाशांचे हाल

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. ४ फेब्रुवारी**




राज्य परिवहन महामंडळाच्या किनवट आगाराचा नियोजनशून्य कारभार सध्या प्रवाशांच्या मुळावर उठला आहे. गेल्या चार दिवसांपासून दुपारी १ वाजताची किनवट-उमरखेड ही नियोजित बसफेरी कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द केली जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही बस या मार्गावरील शेवटची फेरी असल्याने आदिवासी व दुर्गम भागातील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर बसचे अधिकृत शेड्युल हे किनवट-ढाणकी- गांजेगाव- हिमायतनगर असे आहे. मात्र, आगार व्यवस्थापनाकडून या नियोजित मार्गाला बगल देऊन बस परस्पर आप्पारापेठ मार्गे वळवली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे मूळ मार्गावरील गावांमधील प्रवाशांना तासन्तास ताटकळत राहावे लागत आहे.

उमरखेडवरून किनवटला परतणारी ही शेवटची बस असल्याने शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठी कोंडी होत आहे. पासधारक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, सायंकाळी उशिरापर्यंत बस उपलब्ध नसल्याने विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आगार व्यवस्थापक जाणीवपूर्वक ही फेरी रद्द करून खासगी वाहतुकीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोपही नागरिक करत आहेत.या संदर्भात विभाग नियंत्रक (नांदेड) आणि महाव्यवस्थापक (मुंबई) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. बस सेवा तात्काळ पूर्ववत न झाल्यास तीव्र जन आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त प्रवाशांनी व स्थानिक संघटनांनी दिला आहे.

# दिग्रस नगरपरिषदेसमोर समस्यांचा डोंगर

## पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्याने कारभार अडचणीत

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि. ४ फेब्रुवारी**




नुकत्याच पार पडलेल्या दिग्रस नगरपरिषद निवडणुकीत लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून पंचफुला इंगोले यांची निवड झाली आहे. मात्र, नगरपरिषदेला अद्याप पूर्णवेळ मुख्याधिकारी मिळालेला नसल्याने प्रशासकीय कारभारावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

राजकीय तणाव व प्रशासकीय अडचणींमुळे अधिकारी येथे रुजू होण्यास तयार नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्षांसमोर शहरातील अनेक गंभीर समस्या आवासून उभ्या आहेत. शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक आरोग्य या मूलभूत सुविधांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज आहे. विशेषतः पाणीटंचाई आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील डम्पिंग ग्राउंडला संरक्षक वॉल कंपाऊंड नसल्याने कचरा पसरत असून दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीनेही धोका निर्माण झाला आहे. याशिवाय रस्ते, गटारे, दिवाबत्ती, स्वच्छता कर्मचारी संख्या आणि कचरा व्यवस्थापन याबाबतही अनेक कामे प्रलंबित आहेत. नागरिकांनी नव्या नगराध्यक्षांकडून विकासात्मक कामांची अपेक्षा व्यक्त केली आहे. मात्र, जोपर्यंत पूर्णवेळ मुख्याधिकारी नियुक्त होत नाही तोपर्यंत शहराचा कारभार सुरळीत चालेल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाने तातडीने येथे सक्षम मुख्याधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# शेतकऱ्यांच्या नुकसानीस जबाबदार असलेल्या उद्योजकांनी मदत द्यावी : राजु धावंजेवार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ४ फेब्रुवारी**



वणी परिसरातील उद्योगधंदे आणि दयनीय रस्त्यामुळे शेती व्यवसायाला गंभीर नुकसान होत आहे. औद्योगिक कारखान्यामधून निघणारा धूर आणि रस्त्यावरील वाहतूकीमुळे निर्माण होणारी धूळ शेतातील पिकांवर बसते ज्यामूळे पिकांच्या दरहेक्टरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे. वायू प्रदुषण शेतीस मारक ठरत असून नागरीक आणि शेतकरी या समस्येबाबत गंभीर चिंता व्यक्त करीत आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रदुषणास जबाबदार असलेल्या उद्योगधारकांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजु धावंजेवार यांनी प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडे एका निवेदनातून केली आहे.

वणी तालुक्यातील उद्योगांची संख्या सतत वाढत असून खुले भूमीगत कोळसा खाणी, सिमेंट प्रकल्प, चुना भट्टे, डोलामाइट, डांबरप्लांट, गिट्टी क्रेशर, सिमेंटपाईप प्लांट, विट भट्टे इत्यादी लहान मोठे उद्योग वणी तालुक्यात वाढत आहे.

उद्योगामार्फत निघणारा धूर आणि रस्त्यावरील अवजड वाहनाच्या वाहतुकीमूळे हवेत उडणारी धूळ हवेतून सर्वत्र पसरते ही धूळ शेतातील पीकावर व झाडांवर बसल्यामुळे प्रकाशसंश्लेषणाची क्रिया मंदावते परिणामी पिकांची वाढ व उत्पादन दोन्ही कमी होतात. जवळपास चार ते पाच दशकापासून शेतीत कोळसा आणि सिमेंट मिश्रीत धुळीचे संचयन होत आहे. वाहनातून निघणारा इंधन धूर वातावरणात मिसळत असल्यामुळे दर हेक्टरी कापसाचे उत्पादन २५ ते ३० क्विंटल तर सोयाबीनचे उत्पादन ८ ते १० क्विंटलपर्यंत कमी झाले आहे. अशाप्रकारे घटणाऱ्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांच्या पिकावरचा खर्चही निघत नाही. परिणामी शेतकरी गंभीर सकंटात सापडला आहे.जबाबदार उद्योजकांनी आर्थिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी अशा प्रकारची मागणी मानवी हक्क सुरक्षा परिषदेद्वारे प्रदेश अध्यक्ष राजु धावंजेवार यांनी महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण महामंडळ चंद्रपूर यांचेकडे केली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांची ग्राम पंचायत लोही येथे भेट

**•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी| दारव्हा दि. ४ फेब्रुवारी**




दि. ०४ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अभियान अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी ग्राम पंचायत लोहीला भेट दिली असता, प्रधानमंत्री आवास योजना ची माहिती घेऊन गावातील घरकुल लाभार्थी निळकंठ कदम, मोहन वाघ, सुभाष वाघ यांच्या घरकुलाचे भूमिपूजन केले तदनंतर ग्रा.पं.ला भेट दिली असता मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान बाबत माहिती घेतली. अभियाना अंतर्गत काही मदत लागल्यास मागणी करावी अशी त्यांनी म्हटले.

तसेच ग्राम पंचायतच्या इतर कामकाजाची पाहणी करून चांगल्या प्रकारे कार्य केले आहे असे म्हटले नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वागत ग्रा.प. लोहीचे सरपंच संजय शिंदे व पं.स. दारव्हा गटविकास अधिकारी राजीव शिंदे यांचे स्वागत लोही चे उपसरपंच राजूभाऊ हळदे यांनी केले

तसेच विस्तार अधिकारी फुटाणे यांचे स्वागत तुकाराम बिजवे यांनी केले. विद्याधर चौधरी, गिरी, कोल्हे, जि. प. शाळाचे शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रा. पं. कर्मचारी, आशा सेविका इत्यादी कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**
Old Name in passport No 1566163 is Abdul **Kadir Abdul Rauf Dosani.**
New Name in Documents. **Kadir Rauf Dosani**
I will hereafter use my New Name as **Kadir Rauf Dosani**
in all my transactions and deeds.
Address - Mubarak Nagar, Arni Dist Yavatmal -445301

**CHANGE OF NAME**
Old Name in is **Abdul Rauf Dosani.**
New Name in Documents. **Rauf Dosani**
I will hereafter use my New Name as **Rauf Dosani**.
in all my transactions and deeds.
Address - Mubarak Nagar, Arni Dist Yavatmal -445301

# महिलांचा दारूबंदीकरिता पोलीस ठाण्यावर मोर्चा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. ४ फेब्रुवारी**



मौजा घनमोड येथे सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे गावातील शांतता व सामाजिक सुव्यवस्था पूर्णतः बिघडली असून, याविरोधात गावातील महिलांनी एकत्र येत पोलीस स्टेशनमध्ये धडक देत निवेदन सादर केले. घनमोड गावात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असून, दारू विक्रेत्यांना मोटारसायकलद्वारे घरपोच दारू पुरवठा केला जात असल्याचा गंभीर आरोप महिलांनी केला आहे. दररोज मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री होत असल्याने गावात भांडणे, शिवीगाळ, दहशत निर्माण झाली असून, महिलांना व नागरिकांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दारू विक्री करणारा व्यक्ती कोणी नाव सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देतो, तसेच शिवीगाळ करतो. "पोलीस माझे काहीच बिघडवू शकत नाहीत" असे सांगत खुलेआम दहशत पसरवत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, प्रत्येक रविवारी संबंधित बीट अंमलदार दारू विक्रेत्याकडून पैसे घेण्यास जात असल्याचा गंभीर आरोप महिलांनी केला असून, बीट अंमलदार व दारू विक्रेत्यांमध्ये आर्थिक संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व प्रकारामुळे गावात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, कोणत्याही क्षणी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे महिलांनी स्पष्ट केले. अवैध दारू विक्रीवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा महिला मंडळाच्या वतीने उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## नकलांनी प्रेक्षक हसून हसून लोट पोट लोककला लोकाश्रयावरच जिवंत राहणार : डॉ. अलोणे

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ४ फेब्रुवारी**



लोककला रंजन आणि प्रबोधनाचे सशक्त माध्यम आहे लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब त्याच्यात सामावले आहे बदलत्या अभिरुची मुळे आणि वाढत्या सांस्कृतिक आक्रमणामुळे लोकाश्रयावर जिवंत राहणाऱ्या लोककला लोकपाबत आहेत त्यांचे जतन करणे काळाची गरज आहे असे मत लोक कलावंत डॉ. दिलीप अलोने यांनी व्यक्त केले लोकमान्य टिळक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बांजरी येथील विशेष शिबिरात नकला कार्यक्रमाच्या सादरीकरणात ते बोलत होते प्रारंभी कार्यक्रम अधिकारी डॉ. नीलिमा दवणे व डॉ. विकास जुंगरी यांनी डॉक्टर अलोने यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला यावेळी व्यासपीठावर सरपंच अरुणाताई जेनेकर उपसरपंच अमोल कुंभारे व विकास जेणेकरून उपस्थित होते वर्तमान सामाजिक वास्तवाचे भान जपण्यासाठी संवेदना जागृत ठेवा असे आवाहन करीत डॉ. अलोने यांनी पठ्ठ्या महाद्या मावलगन कवा होणार मला निवडून द्या या नकलांनी उपस्थित त्यांना पोट धरून हसायला लावले आपल्या समर्थ अभिनय आणि संवाद शैलीत नकलांचे सादरीकरण करून विद्यार्थी व गावकरी यांची प्रसवंशा मिळविली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय बिलोरीया स्वयंसेवक दुष्यंत खामनकर ऋतुजा रामगिरवार नीलिमा काथोटे रुद्र कनाके यांनी परिश्रम घेतले.

**मिरा किशोर पागोरे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, बाभुळगाव जिल्हा, यवतमाळ**
ई-मेल:-tah.babhulgaon@gmail.com दुरध्वणी क्रमांक-०७२०३-२७०५२४

क्रमांक/जन्म/मृत्यु नोंद आदेश/00/2025 दिनांक:- 03/02/2026

## जाहिरनामा

**अर्जदार पांडुरंग उध्दवराव कांबळे रा. नायगाव** यांनी तहसिल कार्यालय बाभुळगाव येथे अर्ज सादर करुन त्यांनी त्यांचे वडील/आई/पत्नी/मुलगा/मुलगी नामे स्वत: **पांडुरंग उध्दवराव कांबळे** यांचा जन्म **दिनांक 19/05/1956** रोजी मौजा **नायगाव** येथे झाला असुन सदरची नोंद ग्रामपंचायत/नगर पंचायत मौजा नायगांव स्तरावरील अभिलेखात झालेली नसल्यामुळे सदर नोंद घेण्याचा आदेश जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम 1969 चे कलम 13 (3) चे अंतर्गत तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रजमृनो 2525/ई-ऑ 991181) प्रक्र 22/कु. क. दिनांक 12 मार्च 2025 नुसार घेण्याबाबत अर्ज आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयास सादर केला आहे.

करीता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, वरील नोंद घेण्याबाबत आदेश पारीत करण्याचे अनुषंगाने ज्या हितसंबधितांना उजर असल्यास काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी सदर जाहिरनामा प्रसिध्द तारखेपासुन 15 दिवसांचे आंत तहसिल कार्यालय बाभुळगाव येथे स्व:त किंवा अभिकर्त्यामार्फत आक्षेप/हरकती दाखल कराव्यात दिलेल्या मुदतीत आक्षेप हरकती प्राप्त न झाल्यास प्रकरणात जन्म/मृत्यु नोंद बाबतचा उपलब्ध कागदपत्रावरुन संबधित अर्जदार यांचा अर्ज निकाली काढण्यात येईल अथवा मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(मिरा किशोर पागोरे)**
**तहसिलदार बाभुळगाव**

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
गुरूवार, ५ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**

मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदिया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**

जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५८२३७४०

# महिलेचा खून करून मृतदेह बोंडराणी जंगलात फेकला

## मध्यप्रदेशातील होती महिला : दवनीवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** मध्यप्रदेशकडे जाणाऱ्या मार्गावरील बोंडराणी जंगलात महिलेचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला. ही घटना मंगळवारी (दि.३) दुपारच्या सुमारास उघडकीस आली. महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकल्याचे व शरीरावर जखमा असल्याचे आढळल्याने या महिलेचा खून करून मृतदेह जंगलात फेकल्याची शंका व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी दवनीवाडा पोलिसांनी नोंद केली आहे. पूनम राकेश तुमाने (वय २८) रा. खैरी बालाघाट असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.



प्राप्त माहितीनुसार मध्यप्रदेश राज्यातील बालघाट जिल्ह्यातील पूनम राकेश तुमाने ही महिला २८ जानेवारी रोजी खैरी येथीलच संजय तितमारे याच्यासोबत वाराशिवनी न्यायालयात पेशी असल्याचे सांगून घरून आली होती. यानंतर पूनम व संजय हे दोघेही २८ जानेवारीला तिरोडा तालुक्यातील परसवाडा टी पाईटवर आले. तिथून पूनमने आपल्या आईला घरी येणार आहे एवढे सांगून फोन कट केला. मात्र रात्री उशिरापर्यंत पूनम घरी परतली नाही. तर संजयने पूनमच्या घरी जाऊन तुमची मुलगी माझ्यासोबत परत आली नाही. ती घरी आली का अशी विचारणा पूनमच्या वडिलांना केली. यानंतर ते वाराशिवणी व रामपायलीकडे पूनमचा शोध घेण्यासाठी गेले. पण तिचा शोध न लागल्याने बालाघाट जिल्ह्यातील खैरलांजी पोलिस स्टेशन येथे ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलिसांनी पूनमचा शोध घेण्यास सुरुवात केली. मंगळवारी दुपारच्या सुमारास बोंडराणी जंगलाकडे जाणाऱ्या पाणंद रस्त्यालगत पळसाच्या झाडाखाली एका महिलेचा मृतदेह चंद्रकुमार भगत या शेतकऱ्याला आढळला. त्यांनी याची माहिती गावकरी व दवनीवाडा पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच दवनीवाडा पोलिस व घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी रोहिणी बानकर, पोलिस निरीक्षक वैशाली ढाले, सहायक पोलिस निरीक्षक संजय टेकाम हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेहाचा पंचनामा केला. तसेच याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून घटनेचा तपास दवनीवाडा पोलिस करीत आहेत.

### अशी पटली मृतदेहाची ओळख

खैरी येथील रहिवासी महिला पूनम तुमाने ही २८ जानेवारीपासून बेपत्ता असल्याची तक्रार खैरलांजी पोलिस स्टेशन दाखल होती. त्यानंतर मंगळवारी दुपारी बॉंडराणी परिसरात महिलेचा मृतदेह आढळल्याची वार्ता परिसरात वाऱ्यासारखी पसरली. तर महिलेचा मृतदेह आढळल्यानंतर दवनीवाडा पोलिसांनी खैरलांजी व मध्यप्रदेश पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पूनमचे कुटुंबीयसुद्धा मृतदेह पाहण्यासाठी बॉंडराणी येथे पोहचले. त्यांनी तो मृतदेह पूनमचा असल्याचे पोलिसांना सांगितले. यानंतरच हा मृतदेह बेपत्ता असलेल्या पूनम तुमाने या महिलेचा असल्याचे स्पष्ट झाले.

# वनपाल नरेशकुमार पातोडे यांचे सत्कार



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सडक अर्जुनी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयलारी येथे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी मौजा कोयलारी/ शेंडा येथील शाळा व्यवस्थापन समिती व गावकरी यांच्यातर्फे नरेशकुमार पातोडे यांची वनपाल पदावर पदोन्नती व पदस्थापना मासुलकसा वन्यजीव येथे झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सौ चंद्रकलाताई डोंगरवार सदस्या जि. प. गोंदिया, डॉक्टर.डी.एम सुरसात बाम्हणी, कृष्णाजी बावणे सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर गोंदिया, रजनीकांतजी बालदे सरपंच कोयलारी, अरविंदजी पातोडे किसान बोरवेल सडक अर्जुनी, अजयभाऊ राऊत, दिपकजी पातोडे, विनीत हटवार वनरक्षक कोयलारी यांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# कातोर्ली येथे मा.खा.डॉ. अशोक नेते यांची सांत्वन भेट



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** माजी खासदार तथा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोक नेते यांनी आज गोंदिया जिल्हा दौऱ्यानिमित्त मौजा कातोर्ली येथील जि.प.सदस्य किशोर महारवाडे यांचे वडील स्व. सुखरामजी महारवाडे जनसंघाचे ज्येष्ठ नेते यांचे दि. २३ जानेवारी २०२६ ला दुःखद निधन झाले.या दुःखद निधना प्रसंगी त्यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले.

या प्रसंगी मा.खा.डॉ. नेते यांनी शोकाकुल कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला. यावेळी ज्येष्ठ नेते घनश्याम अग्रवाल, भाजपा आमगाव ग्रामीण तालुका अध्यक्ष राजेश हरिणखेडे, कैलास तिवारी, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे, बंडुभाऊ सोनवाने, सरपंच छगनलाल बावनकर, उपसरपंच गौरीशंकर पाथोडे, राऊत ठेकेदार, युवा नेते हितेश डोंगरे तसेच भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार महिन्यापासून अडले पोलिस पाटलांचे मानधन

### पोलिस पाटलांत नाराजीचा सूर

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** अल्प मानधनावर काम करणाऱ्या पोलिस पाटलांचे मानधन मागच्या चार महिन्यापासून अडल्यामुळे जिल्ह्यातील पोलिस पाटील बंधूंनी नाराजी व्यक्त केली आहे.

गावात कायदा व सुव्यवस्था तसेच शांती ठेवण्याचे मोलाचे कार्य पोलिस पाटील बंधू चोवीस तास करत असतात. एव्हढेच नव्हे तर शासनाच्या सर्व विभागात वेळोवेळी आपली सेवा देत असतात.त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून शासन त्यांना अल्पसे असे तुटपुंजे मानधन देत असते. या अल्पशा मानधनावरच ते आपल्या कुटुंबाचा गाडा हाकत असतात.शासनाने ऑक्टोबर ते जानेवारी महिन्यापर्यंतचे पूर्ण मानधन वाटपासाठी जिल्हा पोलिस विभागाकडे निर्गमित केले असल्याची माहिती पोलिस महासंचालक कार्यालयाकडून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यात वाटप शुद्धा झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.परंतु पोलिस अधीक्षक कार्यालयातील दिरंगाई वृत्तीने मागच्या चार महिन्यापासून पोलिस पाटील यांचे मानधन अडवून ठेवले असल्याची बाब समोर आली आहे. कदाचित पोलिस पाटील यांचे मानधन दुसरीकडे तर वळविण्यात आले नाही? असा संशय ही पोलिस पाटील यांच्याकडून घेण्यात येत आहे. वेळेवर मानधन मिळत नसल्याने अनेक पोलिस पाटीलावर उपासमारीची पाळी आली आहे.

> **मानधन वेळेवर मिळत नसल्याने पोलिस पाटील बंधू- भगिनी अडचणीत आले आहेत. मानधन निर्गमित झाले असल्याचे बातमीला वरिष्ठ स्तरावरून दुजोरा मिळाला आहे. मानधनाचे घोडे कुठे अडले हे न समजणारे कोडे आहे.**
>
> **- प्रविण कोचे**

पारदर्शक कारभारासाठी प्रसिद्ध असलेल्या जिल्हा पोलिस विभागातही दिरंगाईवृत्ती तर काम करीत नाही ना? असा संशय ही घेण्यात येत आहे. शासनाने मानधन निर्गमित करूनही ते वाटप न करणाऱ्या आपल्याच कार्यालयातील दिरंगाई यंत्रणेवर अधिक्षक महोदय कारवाई करणार काय? असा प्रश्न ही पोलिस पाटील बंधूंनी उपस्थित केला आहे.

## स्कुल बसच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत रजेगाव येथे स्कुल बसच्या धडकेत इसमाचा मृत्यू झाला. देबीलाल महिपाल ठाकरे (५०) रा. छोटा रजेगाव असे मृताचे नाव आहे. फिर्यादी दिपम ठाकरे यांचे वडिल देबीलाल हे सायकलने रजेगावच्या मुख्य चौकातून जात असतांना काटीकडे जाणारी शाळेची बस क्र. एमएच. ३५/के. ५१९५ चा चालक मुकुंद अंबुले याने देबीलाल यांना धडक दिली. या धडकेत गंभीर जखमी होऊन देबीलालचा मृत्यू झाला. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. ६

## काठीने मारून केले जखमी

**गोंदिया :** डुग्गीपार पोलिस ठाणे अंतर्गत चिखली येथे काठीने मारून जखमी केले. ही घटना २ फेब्रुवारीची आहे. फिर्यादी योगेश उके हे बांधकाम कंत्राटदार असून आरोपी व पत्नी त्यांच्या कामावर जात असत. मात्र आरोपीने पत्नीला दुसऱ्या साईडवर का पाठविले, या कारणावरून काठीने मारून जखमी केले. तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# सालेकसा बस स्टँड करिता पर्यायी जागा त्वरित द्या

## अन्यथा करू आंदोलन, राजेंद्र बडोले यांची प्रशासनाकडे मागणी

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** महाराष्ट्र मध्ये परिवहन महामंडळ मुंबई द्वारा गोंदिया आगार प्रमुख गोंदिया यांच्या आदेशान्वये व प्रवाशांच्या मागणीनुसार गेल्या अनेक दिवसापासून गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा येथे कायमस्वरूपी बस स्टॅन्ड नाही ही एक



सोकांतिकाच म्हणावा लागेल आजही शेवटच्या टोकावर असलेला सालेकसा तालुका अतिदुर्गम भागात असून प्रवाशांकरिता बस स्टॅंड नाही व जवळपास आजही मध्य प्रदेश छत्तीसगड राज्यातून.१०० ते १५० किलोमीटर वरून.सालेकशाला तालुका स्थळ घोषित आहे परंतु स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही सालेकसा,यथे बस स्टॅन्ड नाही परिवहन महामंडळाने सन २०२४, २०२५.या आर्थिक वर्षात लोकप्रतिनिधीच्या पुढाकाराने ३.करोड रुपये मंजूर करण्यात आले आहे परंतु जागे अभावी पैसा कुठे खर्च करावा असा संतप्त सवाल ही जनतेकडून आला आहे बराच भाग आजही सालेकसा तालुक्यात बरीच.जागा वनविभागाला असल्यामुळे जागेची परवानगी मिळणे शक्य होत नाही त्यामुळे मंजूर पैसेही परत जाण्याची दाट शक्यता आहे व महसूल विभागाची जागा हवी असायला पाहिजे अशी परिवहन मंडळाकडून माहिती आहे तर प्रशासनाने महसुलची जागा उपलब्ध करून द्यावा.अशी मागणी भाजपचे महामंत्री व नगरपंचायतचे स्वीकृत सदस्य राजेंद्र बडोले यांनी केली आहे.

> **सालेकशा तालुक्यात आजही ९२ गावाच्या समावेश आहे व जवळपास हजारो प्रवासी साले कशापासून जिल्ह्याच्या मुख्यालय इतर ठिकाणी जाण्याकरिता पावसाळ्यात व उन्हाळ्यात खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे महसूल प्रशासनाने त्वरित जागा उपलब्ध करून द्यावा अन्यथा आंदोलन करू असा इशाराही राजेंद्र बडोले यांनी दिला आहे.**

# नीलकमल स्मृती गुणवत्ता पुरस्कार जाहीर

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सडक अर्जुनी :** फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत चिखली येथील रत्नदीप विद्यालयातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकविणाऱ्या तसेच याच विद्यालयातून इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना

नीलकमल स्मृती फौंडेशनच्या वतीने नीलकमल स्मृती प्रीत्यर्थ सेवानिवृत्त शिक्षक आर. व्ही. मेश्राम यांनी ' नीलकमल स्मृती गुणवत्ता पुरस्कार' नुकताच जाहीर केला आहे. यावेळी मुख्याध्यापक एल. एम. पातोडे, शिक्षक, कर्मचारी व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

रोख, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र अशा स्वरूपाचा पुरस्कार असून इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर पुढील होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सदर पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त शिक्षक आर. व्ही. मेश्राम व प्रज्ञा मेश्राम हे त्यांच्या मुलाच्या स्मृती प्रीत्यर्थ २००४ पासून ' नीलकमल स्मृती गुणवत्ता पुरस्काराने विद्यार्थ्यांना सन्मानित करीत आहेत.

# संत तुकाराम महाराज जयंती व समाज भवन लोकार्पण



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सडक अर्जुनी :** कुणबी समाज संघटना, सडक अर्जुनी यांच्या वतीने आयोजित जगद्गुरु संत तुकाराम महाराज जयंती सोहळा व महिला हळदीकुंकू कार्यक्रम आज उत्साहात पार पडला. या कार्यक्रमानिमित्त समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या कुणबी समाज भवनाचे ३० लक्ष रुपयाचे बांधकाम माजी खासदार मा. सुनीलजी मेंढे यांच्या विकास निधीतून पूर्ण करण्यात आले, सदर समाज भवनाचा लोकार्पण सोहळा सौ. शुभांगी सुनील मेंढे यांच्या हस्ते संपन्न झाला.

कुणबी समाजासाठी स्वतंत्र व सुसज्ज समाज भवन उपलब्ध होणे ही समाजाच्या एकोपा, सांस्कृतिक जतन आणि भावी पिढ्यांच्या सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची पायरी असल्याचे मत यावेळी सौ. मेंढे यांनी व्यक्त केले. या समाज भवनामुळे विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. संत तुकाराम महाराजांचे विचार, सामाजिक समतेचा संदेश आणि महिलांच्या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. अशा उपक्रमांमुळे समाज अधिक संघटित व सक्षम होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास जि.प. अध्यक्ष श्री. लायकरामजी भेंडारकर, सौ. शारदा राजकुमार बडोले, श्री. देवचंदजी तरोने, न.प. उपाध्यक्ष सौ. वंदना डोंगरवार, श्री. अंकित भांडारकर, श्री. राजभाऊ हेडाऊ, सायमा शेख, सौ. कमला अग्रवाल, श्री. राजेश कटाने, श्री. मधुसूदन दोनोडे, सौ. शीलाताई भंडारकर, सभापती सौ. मुक्ताबाई हत्तीमारे, सभापती सौ. रजनीताई परिहार, सौ. शशिकला टेंभुर्णी, श्री. रामभाऊ गायधने, श्री. महिंद्र वंजारी, श्री. नारायण भंडारकर, श्री. माधवराव तरोने, सौ. पुष्पा खोटेल, श्री. विनोद बारसागडे श्री. दिनेश हुकरे, श्री. ललित डोंगरवार, यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल संत गाडगे कुणबी समाज संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्व आयोजकांचे मान्यवरांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांना तत्काळ धानाचे चुकारे अदा करा

## अधिकार सामाजिक संघटनेची मागणी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** मागच्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील खरिप धान पिकाचे चुकारे शासनाकडे अडले आहेत त्यातच शासनाने जाहिर केलेले धान बोनस अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात वळते करण्यात आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होत असल्याने शासनाने तत्काळ धान चुकारे व बोनस अदा करण्यात यावा अशी मागणी अधिकार सामाजिक संघटनेने राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने धान पीक पिकवून ते शासकीय आधारभूत केंद्रावर विक्री केली.धान विक्री करून दोन महिन्यापेक्षा अधिक काळ लोटला तरी अजूनही शासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या धानाचे चुकारे अदा केले नाही. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून शासनाने बोनस जाहीर केले होते. ते बोनस सुद्धा शेतकऱ्यांचा पदरात पडले नाही. आता रब्बी हंगाम सुरू झाला आहे अश्यात शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्यामुळे शेतकऱ्यांचा जीव मुठीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तत्काळ धानाचे चुकारे व बोनस अदा करण्यात यावा अशी मागणी संघटनेच्या वतीने राज्याचे मुखमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनातून करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष मनीष मेश्राम, संयोजक आशिष नागपुरे, श्याम गणवीर, विजय बोरकर, दिलीप लिल्हारे, जितेन्द्र रेहेकवार, मुन्नालाल मेश्राम, गंगाप्रसाद मस्करे, विक्रम मानेकर, योगेंद्र पटले, ?ड.किशोर गडपायले, शैलेश वासनिक, शिवलाल नेवारे, देवेंद्र रामटेके प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्नेहसंमेलनात गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** जी. के. कला व विज्ञान महिला महाविद्यालयात प्राचार्या प्रतिमा यादव यांच्या मार्गदर्शनात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या संस्था सचिव जी के दसरिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तमजी बनोठे, सामाजिक कार्यकर्त्या सविताताई बेदरकर तसेच विशेष अतिथी म्हणून ताराबाई दसरिया , सुधीर दसरिया, सुनील दसरिया उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या महत्त्वाच्या टप्प्यात शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा तसेच शासकीय नोकरीत निवड झालेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे, स्मृतिचिन्हे व रोख प्रदान करण्यात आली. स्नेहसंमेलनात विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्य, गीत, नाट्यछटा व समूहगायनाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वैष्णवी तुमसरे व विशाखा उदापुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.सिमरन भगत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# सरपंच, उपसरपंच संघटनेच्या प्रभारी अध्यक्षपदी बन्सीधर म्हणजे तर सचिवपदी प्रदीप कांबळे यांची निवड



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोर :** अर्जुनी मोर तालुक्यात एकूण ७१ ग्रामपंचायती असून दिनांक ११ व १२ फेब्रुवारी २०२० रोजी २८ ग्रामपंचायतीची मुदत संपत असल्याने तालुका सरपंच उपसरपंच संघटनेची बैठक बोलावून सरपंच उपसरपंच संघटनेचे प्रभारी सरपंच म्हणून बन्सीधर लंजे तर सचिव पदावर प्रदीप कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली सभेला तालुक्यातील सर्व सरपंच उपसरपंच हजर होते नवनिर्वाचित प्रभारी सरपंच व सचिव यांचे संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# जिल्हा ग्रंथोत्सव मोहिमेअंतर्गत काढण्यात आली ग्रंथ दिंडी'

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाने 'गोंदिया ग्रंथोत्सव' हा दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला होता. पहिल्या सत्राची सुरुवात ग्रंथ दिंडीच्या मिरवणुकीने झाली. मिरवणुकीत भारतीय संविधान ठेवण्यात आले. सहाय्यक देणगी आयुक्त डॉ. दिशा के. पजाई, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा, अधिवक्ता विकास साठे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोठेवार, ग्रंथालय सचिव डी.डी. रहांगडाले आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती मीनाक्षी कांबळे यांच्यासह इतरांनी ग्रंथ दिंडीची पूजा केली.



मिरवणूक जयस्तंभ चौक, डॉ. आंबेडकर चौक, नेहरू चौक, गोरेलाल चौक, गांधी पुतळा चौक आणि अग्रसेन गेट मार्गे श्री गुरुनानक सभागृहात पोहोचली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दत्तोरा येथील विद्यार्थ्यांनी सुंदर लेझीम सादरीकरण केले. श्री गुरुनानक इंग्लिश कॉन्व्हेंट स्कूल आणि एसएस गर्ल्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला. रॅलीमध्ये सिकलसेल जागरूकता मोहिमेचे बॅनर देखील प्रदर्शित करण्यात आले. सहाय्यक शिक्षक इशुलाल एस. बिसेन, निशा वासनिक, वरिष्ठ प्राचार्य मुनेश्वर बी. चौधरी, अंकुश कात्रे, नेपाल पटले, संजय कातरकर, संतोष डोये, के.एम. पटले, विजय आखाडे, प्रशांत खरात, डॉ. लालचंद पारधी, यशवंत भगत आणि आझाद ग्रंथालयाच्या ग्रंथपाल रिजवाना शेख यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

# लोखंडी साहित्य लंपास

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव पोलिस ठाण्यांतर्गत कन्हळगाव येथे ४४ हजार रुपये किंमतीचा लोखंडी साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. ही घटना ३ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. फिर्यादी जितेंद्र मेश्राम यांच्या घराचे बांधकाम सुरू असून घरासाठी आणलेले लोखंडी साहित्य किंमत ४४ हजार १०० रुपये अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
गुरुवार दि.०५ फेब्रुवारी २०२६

## दहावी व बारावीच्या परीक्षेसाठी प्रशासन सज्ज

**भंडारा :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी जिल्हा प्रशासन व शिक्षण विभाग सज्ज आहे. यंदा भंडारा जिल्ह्यात दहावीचे १५,४१९ तर बारावीचे १६,८७८ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. याकरीता प्रशासनाने दहावीकरीता ८८ तर बारावीकरीता ६७ परीक्षा केंद्र निर्माण केले आहेत.

भंडारा जिल्ह्यात दहावी व बारावीची शालान्त परीक्षा निर्भिड व पारदर्शक पार पाडण्यासाठी एकूण १५५ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये दहावीकरीता ८८ केंद्र तयार करण्यात आले आहे. यात भंडारा तालुक्यात १६, मोहाडी १३, तुमसर १७, साकोली १४, लाखनी ८, लाखांदूर १० व पवनी १० तसेच बारावीच्या परीक्षेकरीता ६७ केंद्र तयार करण्यात आले आहे. यामध्ये भंडारा १८, मोहाडी १०, तुमसर ७, साकोली १०, लाखनी ८, लाखांदूर ६ व पवनी तालुक्यात ८ परीक्षा केंद्रांचा समावेश आहे. परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार थांबविण्यासाठी जिल्हास्तरावर ६ विशेष भरारी पथके तैनात करण्यात येणार आहेत. तसेच सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२



## खा. प्रशांत पडोळे यांचे निलंबन रद्द करा!

### धनराज साठवणे यांच्या नेतृत्वात निवेदन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** लोकसभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्यामुळे भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांना संसद कामकाजातून निलंबित करण्यात आले आहे. हा निर्णय लोकशाही मूल्यांना धरून नसून अन्यायकारक असल्याचा आरोप करीत भंडारा शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती यांना निवेदन सादर करण्यात आले.

दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान विरोधकांच्या आवाजाला दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. याच पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्याने खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई म्हणजे लोकप्रतिनिधींच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

भंडारा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धनराज साठवणे यांनी तीव्र शब्दांत या निलंबनाचा निषेध नोंदवला. ते म्हणाले की, 'डॉ. प्रशांत पडोळे हे जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमी संसदेत आवाज उठवत आले आहेत. लोकशाही मार्गाने दिलेल्या घोषणांबद्दल निलंबन करणे ही हुकूमशाही वृत्ती दर्शवते. सत्ताधाऱ्यांना विरोध सहन होत नसेल, तर ते लोकशाहीसाठी धोकादायक आहे.'

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संसद ही चर्चेचे व मतभिन्नतेचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. विरोधी पक्षातील खासदारांना बोलू न देणे, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करणे हे संविधानाच्या भावनेला धरून नाही. त्यामुळे डॉ. प्रशांत पडोळे यांचे निलंबन तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी राष्ट्रपतींकडे करण्यात आली आहे.

यावेळी काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी 'लोकशाही वाचवा', 'विरोधकांचा आवाज दाबू नका' अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला. हा लढा केवळ एका खासदाराचा नसून, संपूर्ण देशातील लोकशाही मूल्यांचा असल्याचेही काँग्रेसने स्पष्ट केले आहे.

यावेळी अभिजीत वंजारी,शंकर तेलमासरे, गजानन बादशाह,शेख नवाब पटेल,किशोर राऊत,प्रमोद मानापुरे, लखणलाल चौरे,भगवान राऊत, जयश्री मेश्राम,नरेशचंद्र कावळे, पवन वंजारी,उमेश मोहतुरे, गिरीश रहांगडाले,मार्तंड बडोले, जीवन भजनकर, विनीत देशपांडे, अमित हूमने,रतन मेश्राम, व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपाचा पक्षप्रवेश आणि काही मिनिटांतच रद्द

### ईडीच्या भीतीतून 'क्लीन वॉश' मिळविण्याचा प्रयत्न फसला का?



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**नाकाडोंगरी :-** भंडारा जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात कधीही न घडलेली, धक्कादायक आणि चर्चेचा केंद्रबिंदू ठरणारी घटना नुकतीच घडली आहे. ठाकचंद मुंगूसमारेयांचा महाराष्ट्र विधान परिषद आमदार डॉ. परिणय फुके यांच्या उपस्थितीत आणि हस्ते भारतीय जनता पार्टीत अधिकृत पक्षप्रवेश झाला. मात्र, या पक्षप्रवेशाला अवघी काही मिनिटेही पूर्ण होण्याआधीच तो रद्द करण्यात आल्याने संपूर्ण भंडारा जिल्हा आणि राज्याच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, भारत देशात भाजपाकडून झालेला हा पहिलाच असा पक्षप्रवेश मानला जात आहे, जो तात्काळ रद्द करण्यात आला. त्यामुळे हा प्रकार केवळ जिल्हा पातळीवर मर्यादित न राहता राज्यस्तरीय राजकीय चर्चेचा विषय बनला आहे.

**ईडीच्या पत्रानंतरच भाजपात प्रवेश?**

या संपूर्ण घटनेला वेगळे परिमाण देणारी बाब म्हणजे, काही दिवसांपूर्वी ठाकचंद मुंगूसमारे यांना ईडी (अंमलबजावणी संचालनालय) कडून पत्र मिळाल्याची जोरदार चर्चा परिसरात होती. त्यानंतरच 'ईडीच्या कारवाईच्या भीतीपोटी ठाकचंद मुंगूसमारे भाजपामध्ये प्रवेश करणार' अशी चर्चा आष्टी जिल्हा परिषद क्षेत्रासह संपूर्ण भंडारा जिल्ह्यात सुरू झाली होती.याच पार्श्वभूमीवर भाजपामध्ये प्रवेश झाल्याने जनतेच्या मनात संशयाची ठिणगी पेटली.

'ईडीची नोटीस आली की भाजपात प्रवेश केला जातो?' भाजपामध्ये गेल्यावर चौकशी थांबते का? हेच का क्लीन वॉशचे राजकारण? असे थेट प्रश्न आता उघडपणे विचारले जात आहेत.

**पक्ष बदलण्याचा प्रदीर्घ इतिहास**

ठाकचंद मुंगूसमारे यांचा राजकीय प्रवास पाहिला तर तो सतत पक्षांतरांनी भरलेला असल्याचे स्पष्ट होते. ते सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (घड्याळ चिन्ह) मध्ये होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गट, पुढे राष्ट्रवादी शरद पवार गट (तुतारी चिन्ह), आणि नंतर शिवसेना शिंदे गट असा प्रवास केला.

प्रत्येक वेळी नवीन राजकीय समीकरण, नवीन सत्ता समीप जाण्याचा प्रयत्न आणि त्यानंतर निर्माण होणारे वाद असा पक्षांतरांचा सिलसिला सुरूच राहिला. याच दरम्यान ईडीकडून पत्र आल्याची माहिती समोर आली, आणि लगेचच भाजपामध्ये प्रवेश झाल्याने संशय अधिकच बळावला.

**भंडारा जिल्ह्यात तीव्र प्रतिक्रिया**

या घटनेनंतर आष्टी जिल्हा परिषद क्षेत्र, तुमसर तालुका आणि संपूर्ण भंडारा जिल्ह्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.सामान्य नागरिक, कार्यकर्ते आणि राजकीय निरीक्षक एकाच सुरात म्हणत आहेत. इतके वर्ष पक्ष बदलले, आता ईडीची नोटीस आली आणि भाजपात प्रवेश' पण काही मिनिटांतच प्रवेश रद्द हे राजकारण नाही तर विनोद झाला आहे!

**राजकारण की 'क्लीन वॉश' संस्कृती?**

ही घटना केवळ एका व्यक्तीचा पक्षप्रवेश रद्द होण्यापुरती मर्यादित नाही, तर देशातील राजकारणात निर्माण झालेल्या 'क्लीन वॉश' संस्कृतीवर थेट बोट ठेवणारी आहे.

सत्ता, तपास यंत्रणा आणि पक्षप्रवेश यांचा परस्पर संबंध पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पक्षप्रवेश झाला मात्र काही मिनिटांतच प्रवेश रद्द! भंडारा जिल्ह्याच्या राजकारणात हा प्रकार अभूतपूर्व, धक्कादायक आणि प्रश्न निर्माण करणारा ठरला आहे.

## नाना पटोलेंच्या विश्वासूचा भाजपमध्ये प्रवेश

**भंडारा :** काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे भंडारा जिल्ह्यातील विश्वासू ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष शंकर राऊत यांनी काँग्रेसला रामराम ठोकून सोमवारी २ फेब्रुवारी रोजी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.शंकर राऊत हे केवळ ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष नव्हते, तर नाना पटोले यांच्या राजकीय रणनीतीमधील एक महत्त्वाचा दुवा मानले जात होते. हक्काच्या माणसानेच साथ सोडल्याने नाना पटोलेंना हा मोठा राजकीय आणि वैयक्तिक धक्का मानला जात आहे.भाजप नेते परिणय फुके व भाजपा जिल्हा अध्यक्ष आशु गोंडाने यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. फुके यांनी अत्यंत गुप्तपणे ही राजकीय खेळी यशस्वी केल्याची चर्चा आहे.

## भंडाऱ्यात आरटीओ प्रशासनाकडून भव्य वॉकथॉन

### 'रस्ता सुरक्षा-जीवन रक्षा' सुरक्षित प्रवासासाठी तरुणाई उतरली रस्त्यावर



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** वाढते अपघात रोखण्यासाठी आणि रस्ते वाहतुकीचे नियम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा यांच्या वतीने आज शहरात भव्य 'वॉकेथॉन' आयोजित करण्यात आली होती. सुमारे ३०० तरुण-तरुणींच्या सहभागाने निघालेल्या या रॅलीतून भंडारावासीयांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

हा कार्यक्रम उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश जाधव यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. रॅलीमध्ये आरटीओ विभागाचे मोटार वाहन निरीक्षक वैभव गुल्हाणे, निलेश दहेकर, बालाजी वर्धन, शेखर आचार्य, सुहास ठोंबरे, प्रशांत पाटील तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सागर सराफ, गुलशन कुमार चावरे, अनिल ढोले आणि श्रीमती मेघाराणी काशिद यांच्यासह कार्यालयातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे, या सामाजिक उपक्रमात अनाथपिंडक ॲथलेटिक्स क्लब, भंडारा चे संचालक जयंत तांडेकर हे त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जितेंद्र बोरकर आणि वाहतूक विभागाचे कर्मचारी देखील या वॉकेथॉनमध्ये सहभागी झाले.

या वॉकेथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये आरटीओ आणि वाहतूक विभागाची वाहने सहभागी होती. या वाहनांवरील ध्वनिक्षेपकाचा वापर करून शहरातील मुख्य चौक आणि गर्दीच्या ठिकाणी नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत भावनिक व जागृतीपर आवाहन करण्यात आले.

'रस्त्यावरील शिस्त ही केवळ दंड टाळण्यासाठी नसून तुमचे प्राण वाचवण्यासाठी आहे,' असा काळजाला भिडणारा संदेश यावेळी देण्यात आला.

ही भव्य वॉकेथॉन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा येथून सुरू होऊन शहरातील प्रमुख गजबजलेल्या ठिकाणांहून मार्गस्थ झाली. यात जिल्हा परिषद चौक ते राजीव गांधी चौक, मुस्लिम लायब्ररी चौक, गांधी चौक, पोस्ट ऑफिस चौक, बस स्टँड परिसर ते त्रिमूर्ती चौक अशा विविध मार्गांवरून ही रॅली पुन्हा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा येथे विसर्जित झाली.

**उजव्या बाजूने चालण्याबाबत जनजागृती**

वॉकेथॉन दरम्यान सहभागी ३०० तरुण-तरुणींनी घोषणांच्या माध्यमातून नागरिकांचे लक्ष वेधले. पादचाऱ्यांनी रस्ते सुरक्षिततेसाठी व अपघात टाळण्यासाठी नेहमी रस्त्याच्या उजव्या बाजूने (वाहतुकीच्या समोरासमोर) चालावे, जेणेकरून समोरून येणारी वाहने स्पष्ट दिसतील, असे विशेष आवाहन यावेळी करण्यात आले.

**संयुक्त प्रयत्नांना यश**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा, पोलीस विभाग, अनाथपिंडक ॲथलेटिक्स क्लब आणि तरुणाईच्या या संयुक्त प्रयत्नामुळे रस्ता सुरक्षा मोहिमेचा संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचला आहे.

## जिल्हा ग्रंथोत्सवात शासकीय योजनांचे प्रदर्शन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित जकातदार विद्यालयात दि.५ फेब्रुवारीपासून होणाऱ्या दोन दिवसीय जिल्हा ग्रंथोत्सवामध्ये जिल्हा माहिती कार्यालयाद्वारे शासकीय योजनांच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी व त्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शासकीय योजनांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन माननीय पालकमंत्री पंकज भोयर, जिल्हाधिकारी सावनकुमार तसेच पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.हे प्रदर्शन तीन दिवस असून या प्रदर्शनामध्ये विविध विभागांच्या शासकीय योजनांची माहिती, लाभ व अंमलबजावणी याबाबतची माहिती सचित्र स्वरूपात नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या संयुक्त प्रदर्शनाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ दांदळे यांनी केले आहे.

## अपघातात चालक जखमी

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा तालुक्यातील भिलेवाडा-खडकी मार्ग वाहनधारकांसाठी कर्दनकाळ ठरत असून जीवघेणी खड्ड्यांमुळे धोका पत्करून प्रवाश्यांना प्रवास करावा लागत आहे. परिणामी, अपघाताची मालिका सुरूच आहे. दि. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता दरम्यान मोटारसायकल अनियंत्रित होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. रामेश्वर मारोती भुजाडे (५०) रा. मांडवी असे जखमीचे नाव आहे.

मांडवी येथील रामेश्वर भुजाडे हे घटनेच्यावेळी मोटारसायकल क्र.एम.एच. ३६/पी.८१९९ या गाडीने भंडाऱ्यावरून स्वगावाकडे खडकी मार्गाने जात असताना सुरेवाडा पुलावर खड्ड्यांमुळे मोटारसायकल अनियंत्रित होऊन डिव्हाडरला आदळली. त्यात मोटारसायकलस्वार जखमी झाले.

## 'आश्रय' बाल सुधार गृहातून ३ मुलींचे पालायन,पोलीसांकडुन शोध सुरू

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** कारधा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील 'आश्रय'बाल सुधार गृहातून तीन अल्पवयीन मुलींनी पलायन केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडाली आहे. याच सुधारगृहातून यापूर्वीही मुलींनी सुरक्षा भिंत ओलांडून पळ काढला. यामुळे बाल सुधारगृहाच्या कारभाराविषयी आणि सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून कारधा पोलीस मुलींचा शोध घेत आहेत.

विविध गुन्ह्यांमध्ये दाखल असलेल्या अल्पवयीन मुला-मुलींना अटक करता येत नसल्याने पुढील कायदेशीर कारवाई होत नाही, अशा बाल गुन्हेगारांना सुधार गृहात ठेवले जाते. भंडारा तालुक्यातील आमगाव येथे असे आश्रय बालसुधारगृह आहे. या बालसुधारगृहात २५ मुले-मुली राहतात. काही गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल असलेल्या किंवा विविध गैरप्रकरणातून सुटका करून आणलेल्या १८ वर्षांखालील मुलामुलींना येथे आश्रय दिला जातो.

दरम्यान १ फेब्रुवारी रोजी रात्रीचे जेवण झाल्यानंतर सर्व मुली आपापल्या खोलीत झोपण्यासाठी गेल्या. मध्यरात्रीच्या सुमारास सर्वजण तीन मुलींनी सुरक्षा भिंत ओलांडून सुधार गृहातून पळ काढला. दुसऱ्या दिवशी या तीन मुली सुधार गृहात नसल्याचे पाहून प्रशासन खळबळून जागे झाले. तिघींचाही शोध घेण्यात आला मात्र त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही त्यानंतर कारधा पोलिसात या संबंधित तक्रार दाखल करण्यात आली. तक्रार दाखल होताच ठाणेदार गोकूल सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार कांचन टेंभूर्णे, विकास जाधव यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी करून पळून गेलेल्या मुलींचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. या घटनेमुळे पालकांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## 'अजितदादा अमर रहे' घोषणा देत साश्रु नयनांनी वाहिली श्रद्धांजली

### स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे भंडारा शहरातील असंख्य नागरिकांनी घेतले दर्शन





**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ ला महाराष्ट्र राज्याचे लाडके, प्रशासनावर जबर पकड असलेले व लोकप्रिय जननेते माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या बारामतीहून आणलेल्या अस्थिकलशाचे अंतिम दर्शन घेण्याकरीता, त्यांच्या पावन स्मृतिंना उजाळा देण्याकरीता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी साश्रू नयनांनी श्रध्दांजली दिली.

स्व. अजितदादा पवार यांचे अस्थी कलश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालय, भंडारा येथे सकाळी ११.०० वाजता पासून दर्शनाकरीता ठेवण्यात आले. दादाचे सर्व पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक, शेतकरी, महिला व युवक अशा सर्व क्षेत्रातील नागरिकासोबत जिव्हाळ्याचे नाते होते. करीता संपुर्ण भंडारा जिल्हयातील सर्वपक्षीय असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. अत्यंत शोकाकुल वातावरणात हा दर्शन सोहळा पार पडला. यावेळी गुरुदेव सेवा मंडळ गणेशपूरचे भजन सादर करण्यात आले. स्व. अजितदादा पवार यांनी भंडारा जिल्हयातील गोसे प्रकल्प, सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्प, सोंडयाटोला उपसा सिंचन, नेरला उपसा सिंचन, करचखेडा उपसा सिंचन अशा प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. याप्रसंगी त्यांच्या जिल्हयातील विकासासाठी दिलेल्या योगदानावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याकरीता नाना पंचबुध्दे, आमदार राजु कारेमोरे, आमदार नरेंद्र भोंडेकर, धनंजय दलाल, सुनिल फुंडे, माजी खासदार मधुकर कुकडे, माजी आमदार चरण वाघमारे, भंडारा नगर परीषद च्या नगराध्यक्ष सौ. मधुरा मदनकर, श्रीमती सरीताताई मदनकर, जीया पटेल, नरेश डहारे, आशु गोंडाणे, गोपालजी मांडवकर, अनिल गायधने, जयश्री बोरकर, देवचंद ठाकरे, शैलेश मयुर, प्रकाश मालगावे, अनिल सार्वे, कल्पना कुझेकर, अमृत बन्सोड, होमराज कापगते, धनपाल चौधरी, सुरेश धुर्वे, सौ. प्रिती जगनाडे, मधु चौधरी, महादेव मेश्राम, प्रकाश पचारे, राजु माटे यांनी स्व. अजितदादा पवार बरोबर काम करतांनी आपआपले आठवणी व मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी सर्वपक्षीय प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरातील नागरीक, तसेच मोठया प्रमाणात पत्रकार उपस्थित होते. सर्वांनी अस्थिकलशावर पुष्प अर्पण करून सामुहिक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. दुपारी ३.०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यालयातून भजन मंडळींनी गायन करीत अस्थिकलश विसर्जनाकरीता महाल मार्गे गांधी चौक ते पोस्ट ऑफीस चौक ते वैनगंगा घाट जुनापुलाजवळ वैनगंगा नदीमध्ये विधिवत पूजा अर्चना करुन अश्रुपुर्ण वातावरणात अस्थिकलशाचे विसर्जन करण्यात आले. त्यांच्या मृतात्म्यास शांती मिळण्याकरीता सर्व उपस्थितांनी प्रार्थना केली व 'अजितदादा अमर रहे' अशा घोषणा देण्यात आल्या.

यापसंगी उपस्थितांमध्ये डॉ. रविंद्र वानखेडे, एकनाथ फेंडर, परवेज पटेल, यशवंत सोनकुसरे, नागेश भगत, डॉ. श्रीकांत वैरागडे, किर्ती गणविर, रजनिश बन्सोड, राजेश डोरले, अंगराज समरीत, सुरेश बघेल, रितेश वासनिक, यादोराव भोगे, सुनिता उपरीकर, शुभांगी खोब्रागडे, हेमंत महाकाळकर, सौ. मंजुषा बुरडे, सौ. आशा डोरले, आरजु मेश्राम, महेंद्र वाहाणे, सदाशिव ढेंगे, योगराज येलमुले, राजु पटेल, योगेश सिंगनजुडे, धनु व्यास, रुबी चढ्ढा, सचिन कुंभलकर, रवि लक्षणे, लोकेश खोब्रागडे, सुनिल साखरकर, राजु शक्तीकर, दयानंद नखाते, महेबूब पठाण, लोकेश नगरे, प्रा. नारायणसिंग राजपूत, राहुल निर्वाण, मनिष वासनिक, सुकराम अतकरी, निशा राऊत, करुणा तलमले, वंदना तुरस्कर, सरिता तुरस्कर, अजय मेश्राम, धनवंता बोरकर, प्रकाश पचारे, क्रिष्णा उपरीकर, मौसम ठाकुर, विक्रांत वैरागडे, राजू देसाई, नरेंद्र ठाकरे, चंद्रशेखर भिवगडे, व फार मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

